VOL- VI ISSUE-XII DECEMBER 2019 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 5.707 ISSN 2349-638x

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील शारीरिक शिक्षकांच्या कार्यभाराचे मूल्यांकन

**बी.व्ही. श्रीगीरीवार**
शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग
अण्णासाहेब गुंडेवार महाविद्यालय, नागपूर

१.० प्रस्तावना

भारतीय शिक्षण व्यवस्था, शिक्षणाची उद्दिष्टे आणि शिक्षणाची पध्दती काळानुरूप आणि समाजाच्या बदलत्या गरजांनुसार बदलताना आढळते. अनेक स्थित्यंतरानंतर शिक्षण व्यवस्थेला आजचे स्वरूप प्राप्त झाले आहे. देश घडविण्यात भारतीय शिक्षकाची भमिका महत्वपूर्ण आहे. शिक्षकाची कल्पना आज व्यापक स्वरुपाची झालेली आहे कारण आज शिक्षा हे सर्व स्तरातील लोकासाठी खुले आहे. ज्या समाजात शिक्षक या नसत्याने काम करायचे आहे. त्यात चांगले, वाईट, संस्कृत, असंस्कृत सर्वच प्रकारवी माणसे आहेत. त्यामुळे शिक्षकाचे काम बऱ्याच वेळा खुप कठीण होते. शिक्षक ज्या दिशेने प्रयत्न करतात त्याच्या विरुध्द चित्र समाजात काही वेळा आपल्याला दिसून येते.

शिक्षण म्हणजे शाळेत होणारी प्रक्रिया वेगवेगळया स्तरांवर वेगवेगळया विषयांचा होणारा अभ्यास होय. हीच शिक्षणासंबंधीची कल्पना आहे.

शिक्षकाने स्वत: एक सामाजीक दृष्टिकोण स्वीकारला पाहीजे, सामाजिक बांधीलकी मान्य करुन आपल्या आचरणातून आपल्या विचार मार्गदर्शनातून सामाजिक बांधीलकीच्या तत्वज्ञानाचा आदर्श विद्यार्थ्यापुढे आणि समापुढे उभा केला पाहिजे त्याचे वर्तन नेहमी सामाजिक बांधीलकीच्या तत्वाप्रमाणे असावे. या अनुशंगाने, या संशोधनात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठीशी संलंग्नीत महाविद्यालयात कार्यरत शारीरिक शिक्षण प्राध्यापकाच्या शैक्षणिक व समाजिक कार्याची माहिती मिळविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. ते त्यांच्या जबाबदाऱ्या ते कशा प्रकारे ते सांभाळात आहेत याची देखील माहिती मीळविता आली आहे.

२.० संशोधनकार्य पद्धती

संशोधन कार्यासाठी निर्दोष माहिती मिळण्यासाठी व संशोधनाची उद्देशपुर्ती होण्यासाठी सर्वेक्षण व विश्लेषण पद्धतीचा उपयोग करण्यात आला.

२.१ संशोधनाचे कार्यक्षेत्र

प्रस्तुत संशोधन करण्यासाठी संशोधन क्षेत्र म्हणुन अध्ययन कर्त्याने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नीत चारही (नागपूर, वर्धा, भंडारा व गोंदिया) जिल्ह्यांची निवड केली.

२.२ अध्ययन विश्व

प्रस्तूत अध्ययनात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयात कार्यरत सर्व शारीरिक शिक्षण प्राध्यापकांचा अध्ययन विश्व म्हणून विचार करण्यात आला.

२.३ नमुना निवड

प्रस्तुत संशोधनकार्यात संभाव्यता पद्धतीतील साधा यादृच्छिक नमुना निवडण्यात आला आहे. नागपूर विभागात जवळपास ६५० महाविद्यलये आहेत त्यातील १५० महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण प्राध्यापकांची निवड दैव निदर्शन पद्धतीचा अवलंब करून करण्यात आली.

२.४ संशोधन आराखडा

प्रस्तुत संशोधनात वर्णनात्मक व विश्लेषणात्मक अशा मिश्र संशोधन आराखडयाची निवड करण्यात आली आहे.

२.५ संशोधनाची साधने :

प्रस्तुत अध्ययनात माहिती संकलित करण्याकरिता यंशोधनकर्त्याने स्वनिर्मित व प्रमाणीकृत प्रश्नावलीचा उपयोग केला. अध्ययनाच्या उद्दिष्टांना अनुसरून प्रश्नावली तयार करण्यात आली.

२.६ माहितीचे सांख्यिकीय विश्लेषण :

सांख्यकीय तंत्रातील विविध ग्राह्यता चाचणीचा विशेषत्वाने उपयोग करण्यात आला. त्या आधारावर निष्कर्ष काढले गेलेत. प्राप्त माहितीवरुन वारंवारीता व बहुलक काढण्यात आले. अभ्यासातील विविध घटक, पडताळण्याकरिता देण्यात आलेले गृहित प्रमेय आणि वापरण्यात आलेला संशोधनाचा आराखडा लक्षात घेता काई वर्ग मूल्य 'Chi-Square' टेस्टचा वापर करण्यात आला. Significance Level 0.05 ठरविण्याात आली.

३.० सांख्यिकीय विश्लेषण

३.१ शारीरिक शिक्षकांचा व्यावसायिक अनुभव

सारणी क्रमांक १: शारीरिक शिक्षकांच्या व्यवसायिक अनुभवासंबंधी माहिती

| व्यवसायिक अनुभव | शारीरिक शिक्षकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| ५ वर्षांपेक्षा कमी | २३ | १५.३ |
| ५ ते १० वर्षे | २९ | १९.३ |
| १० ते २० वर्षे | ८२ | ५४.७ |
| २० वर्षांपेक्षा अधिक | १६ | १०.७ |
| एकूण | १५० | १००.० |

वरील सारणी क्रमांक १ मध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील शारीरिक शिक्षकांच्या व्यवसायिक अनुभवासंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार १५.३ टक्के शारीरिक शिक्षकांना ५ वर्षांपेक्षा कमी व्यवसायिक अनुभव असून १९.३ टक्के शिक्षकांना ५ ते १० वर्षांचा व्यवसायिक अनुभव आहे. तसेच ५४.७ टक्के शिक्षकांना १० ते २० वर्षांचा व्यवसायिक अनुभव असून २० वर्षांपेक्षा अधिक व्यवसायिक अनुभव असणाऱ्या शारीरिक शिक्षकांचे शेकडा प्रमाण १०.७ टक्के असल्याचे आढळले.

३.२ शारीरिक शिक्षकांचा महाविद्यालयातील सर्व कार्यक्रमांमधील सहभाग

सारणी क्रमांक २: शारीरिक शिक्षकांची महाविद्यालयातील कार्यक्रमांमधील सहभागाचे स्वरूप

| सहभागाचे स्वरूप | शारीरिक शिक्षकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| उच्च | १०३ | ६८.७ |
| मध्यम | ३४ | २२.७ |
| निम्न | १३ | ८.७ |
| एकूण | १५० | १००.० |

वरील सारणी क्रमांक २ मध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील शारीरिक शिक्षकांची सर्व कार्यक्रमांमधील सहभागाच्या स्वरूपासंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ६८.७ टक्के शारीरिक शिक्षक महाविद्यालयातील सर्व कार्यक्रमांमध्ये उच्च सहभाग घेत असून २२.७ टक्के शिक्षक मध्यम सहभाग घेतात. तसेच केवळ ८.७ टक्के शारीरिक शिक्षक महाविद्यालयातील सर्व कार्यक्रमांमध्ये निम्न सहभाग घेत असल्याचे आढळले.

३.३ शारीरिक शिक्षकांचा सामाजिक स्वरूपाच्या कार्यातील सहभाग

सारणी क्रमांक ३: शारीरिक शिक्षकांची महाविद्यालयातील सामाजिक कार्यातील सहभागाचे रूवरूप

| कार्यातील सहभाग | शारीरिक शिक्षकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| उच्च | ३२ | २१.३ |
| मध्यम | १०९ | ७२.७ |
| निम्न | ९ | ६.० |
| एकूण | १५० | १००.० |

वरील सारणी क्रमांक ३ मध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील शारीरिक शिक्षकांची सामाजिक स्वरूपाच्या कार्यातील सहभागासंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार २१.३ टक्के शारीरिक शिक्षकांचा महाविद्यालयातील सामाजिक स्वरूपाच्या कार्यात उच्च सहभाग असून ७२.७ टक्के शिक्षकांचा सामाजिक स्वरूपाच्या कार्यात मध्यम सहभाग आहे.

त्याचप्रमाणे महाविद्यालयातील सामाजिक स्वरूपाच्या कार्यात निम्न सहभाग असणाऱ्या शारीरिक शिक्षकांचे शेकडा प्रमाण केवळ ६ टक्के असल्याचे निदर्शनास आले.

३.४ शारीरिक शिक्षकांची शैक्षणिक कार्यातील सहभागाचे स्वरूप

सारणी क्रमांक ४: शारीरिक शिक्षकांची महाविद्यालयातील शैक्षणिक कार्यातील सहभागाच्या स्वरूपासंबंधी माहिती

| सहभागाचे स्वरूप | शारीरिक शिक्षकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| उच्च | ३१ | २०.७ |
| मध्यम | ९४ | ६२.७ |
| निम्न | २५ | १६.७ |
| एकूण | १५० | १००.० |

वरील सारणी क्रमांक ४ मध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील शारीरिक शिक्षकांची महाविद्यालयातील शैक्षणिक कार्यातील सहभागाच्या स्वरूपासंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार २०.७ टक्के शारीरिक शिक्षकांचा महाविद्यालयातील शैक्षणिक कार्यात उच्च सहभाग असून ६२.७ टक्के शिक्षकांचा शैक्षणिक कार्यात मध्यम सहभाग आहे. त्याचप्रमाणे महाविद्यालयातील शैक्षणिक कार्यात निम्न सहभाग असणाऱ्या शारीरिक शिक्षकांचे शेकडा प्रमाण १६.७ टक्के असल्याचे आढळले.

नियमित कर्तव्याव्यतिरिक्त शारीरिक शिक्षकांवर इतर कार्याची जबाबदारी

सारणी क्रमांक ६: शारीरिक शिक्षकांना नियमित कर्तव्याव्यतिरिक्त इतर कार्याची जबाबदारी घ्यावी लागण्यासंबंधी त्यांच्या प्रतिक्रिया

| प्रतिक्रिया | शारीरिक शिक्षकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | १०५ | ७०.० |
| नाही | २९ | १९.३ |
| सांगता येत नाही | १६ | १०.७ |
| एकूण | १५० | १००.० |

वरील सारणी क्रमांक ६ मध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील शारीरिक शिक्षकांना नियमित कर्तव्याव्यतिरिक्त इतर कार्याची जबाबदारी घ्यावी लागण्यासंबंधी त्यांच्या प्रतिक्रिया आल्या आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ७० टक्के शारीरिक शिक्षकांना नियमित कर्तव्याव्यतिरिक्त इतर कार्याची जबाबदारी घ्यावी लागत असून १९.३ टक्के शारीरिक शिक्षकांना नियमित कर्तव्याव्यतिरिक्त इतर कार्याची जबाबदारी घ्यावी लागत नाही. तसेच नियमित कर्तव्याव्यतिरिक्त इतर कार्याची जबाबदारी घ्यावी लागण्यासंबंधी सांगता येत नाही हे नमूद करणाऱ्या शारीरिक शिक्षकांचे शेकडा प्रमाण १०.७ टक्के असल्याचे आढळले.

४.० निष्कर्ष

४.१ व्यवसायिक अनुभव

- प्राप्त परिणामांच्या सांख्यिकिय विश्लेषणाच्या आधारे असा निष्कर्ष काढण्यात येतो की, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील बहुतांश शारीरिक शिक्षकांना १० ते २० वर्षाचा व्यवसायिक अनुभव आहे.

४.२ महाविद्यालयातील सर्व कार्यक्रमांमधील सहभागाचे स्वरूप

- प्राप्त परिणामांच्या सांख्यिकिय विश्लेषणाच्या आधारे असा निष्कर्ष काढण्यात येतो की, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील बहुतांश शारीरिक शिक्षक सर्व कार्यक्रमांमध्ये उच्च सहभाग घेतात.

४.३ सामाजिक स्वरूपाच्या कार्यातील सहभाग

- प्राप्त परिणामांच्या सांख्यिकिय विश्लेषणाच्या आधारे असा निष्कर्ष काढण्यात येतो की, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील बहुतांश शारीरिक शिक्षकांचा महाविद्यालयातील सामाजिक कार्यात मध्यम स्वरूपाचा सहभाग आहे.

४.४ शैक्षणिक कार्यातील सहभागाचे स्वरूप

- प्राप्त परिणामांच्या सांख्यिकिय विश्लेषणाच्या आधारे असा निष्कर्ष काढण्यात येतो की, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील बहुतांश शारीरिक शिक्षकांचा

महाविद्यालयातील शैक्षणिक कार्यात मध्यम स्वरूपाचा सहभाग आहे.

४.५ नियमित कर्तव्याव्यतिरिक्त इतर कार्याची जबाबदारी घ्यावी लागते

- प्राप्त परिणामांच्या सांख्यिकिय विश्लेषणाच्या आधारे असा निष्कर्ष काढण्यात येतो की, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील बहुतांश शारीरिक शिक्षकांना नियमित कर्तव्याव्यतिरिक्त इतर कार्याची जबाबदारी घ्यावी लागते.

५.० आधारग्रंथ सूची

1. घाटोळे.रा.ना., समाजशास्त्रीय संशोधन तत्व व पध्दती, मंगेश प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती २००९–१०.पृ.क्र. १ ते २३.
2. बोधनकर सुधीर, प्रा. अलोनी विवेक, सामाजिक संशोधन पद्धती, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००३:१४७.
3. बोरकर श्री. गुरुदास म., ‘‘शालेय स्तरावर शारीरिक शिक्षणाची गरज आणि त्याबाबत होणारी उपेक्षा ; एक सर्वेक्षणात्मक अभ्यास’’, लघुशोध प्रबंध, नागपूर विद्यापीठ, पृ.६२–६३, (१९६६)
4. काळे श्री.के.एस., ‘‘शारीरिक शिक्षणातील माध्यमिक शाळेतील, शिक्षणाची सध्यास्थिती’’, लघुशोध प्रबंध, एम.एड. नागपूर विद्यापीठ, नागपूर, पृ.२८ (१९८६,)
5. कोठीवाले प्रा. द. ब., ‘‘शारीरिक शिक्षणाचा विकास’’, श्री.लेखन वाचन भंडार, लक्ष्मी रस्ता, पुणे (१९७७).
6. अहेर हिरा, उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षण, (नागपुर : विद्या प्रकाशन, १९९५), पृ. १८